Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
२०.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १४० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### क्षुल्लक कारणातून तरुणाचा विटांनी ठेचून खून

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चाळीसगाव** – चाळीसगाव बसस्थानक परिसरात क्षुल्लक कारणातून एका तरुणाचा विटांनी ठेचून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. दुकान लावण्याच्या कारणावरून सुरू असलेल्या जुन्या वादातून २७ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात एका संशयिताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २७ वर्षीय अक्षय भानुदास पाटील (रा.लक्ष्मीनगर, चाळीसगाव) हा कुटुंबासह राहत होता. त्याचे आणि निखील सुनील अजबे यांचे बसस्थानकाच्या मागील भागात दुकान लावण्याच्या कारणावरून वाद होत असे.

# खासदार फोडायला पैसे आहेत, मात्र पेपरफुटीमुळे मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मदत करायला नाहीत?

## मुख्यमंत्र्यांकडून साधी विचारणा हि नाही : अभिजित दीपकेंचा हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – आम्ही ६ जूनला पाहिलं आंदोलन केलं तेव्हा खूप लोक आले होते. त्यानंतर आम्ही देशभर आंदोलन केलं. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा अजून झाला नाही.

ज्या मुलांनी आत्महत्या केली त्यांना १ कोटी नुकसान भरपाई दिली पाहिजे, अशी मागणी आम्ही केली आहे. नागपूरमध्ये विद्यार्थने आत्महत्या केली त्याच्या घरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेले नाहीत. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अशी आमची मागणी आहे. नागपूरच्या विद्यार्थ्याला अबुधाबीचे सेंटर मिळाले हे शॉकिंग आहे. त्यांच्याकडे पासपोर्ट नाही, तो कसं जाणार? याच उत्तर धर्मेंद्र प्रधान यांनी द्यावं. खासदार फोडायला पैसे आहेत.

मात्र ज्या मुलानी आत्महत्या केली त्यांना मदत करायला पैसे नाहीत. ही लाजिरवाणी गोष्ट असल्याचे सांगत सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी केली आहे जात-धर्म काढले जात आहेत, त्याने पेपरफुटी थांबणार असल तर माझी जात धर्म काढा मूळ मुद्दा बाजूला करून वेगळे वेगळे फोटो व्हायरल केले जात आहेत. पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिल आहे. कि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, हे आंदोलन फक्त नीट पुरते मर्यादित राहिलेले नाही.

विविध मुद्यावर आम्ही पुढे हे आंदोलन देशभर करणार आहोत. असेही अभिजित दीपके म्हणाले. प्रादेशिक पक्ष फोडले जात आहेत. ते देश विरोधी काम करत आहेत, ते देशाशी गद्दारी करत आहेत.

मात्र प्रादेशिक पक्ष टिकले पाहिजेत. देशात १२ विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. यावर सरकार बोलत नाही. सरकार राजीनामा घेत नाही. प्रधान यांचा राजीनामा घेतल तर सिस्टम व्यवस्थित चालेल. जात धर्म काढले जात आहेत. त्याने पेपर फुटी थांबणार असल तर माझी जात धर्म काढा, असेही अभिजित दीपके म्हणाले. काही दिवसांपूर्वी देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही बेरोजगार तरुणांची तुलना 'कॉक्रोच' म्हणजेच झुरळांशी केली होती.

# आषाढी वारीसाठी 'लालपरी' सज्ज!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठलभक्तांच्या सेवेसाठी राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) मोठी तयारी केली आहे. राज्यभरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सोयीसाठी तब्बल ५,५०० विशेष एसटी बसेस सोडण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात आणि विठ्ठलनामाच्या गजरात पंढरपूरकडे निघालेल्या भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुलभ आणि सुखकर व्हावा यासाठी एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. विशेष म्हणजे, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## पंढरपूरसाठी ५,५०० विशेष एसटी बसेस | ४० भाविकांनी मागणी केली तर गावातूनच थेट सेवा



वारकऱ्यांच्या सेवेसाठी विशेष नियोजन : दरवर्षी लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वे, खासगी वाहने आणि एसटीच्या माध्यमातून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. यंदाही भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित असल्याने एसटी प्रशासनाने अतिरिक्त बसेस, कर्मचारी आणि सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला आहे. भाविकांनी विशेष बस सेवेसाठी आपल्या जवळच्या एसटी आगारात संपर्क साधून आगाऊ नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना सवलती कायम : आषाढी यात्रेसाठी चालवल्या जाणाऱ्या विशेष बस सेवांमध्ये शासनाच्या विविध सवलती कायम राहणार आहेत. 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत ७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास; 'महिला सन्मान योजना' अंतर्गत महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत. यामुळे विठुरायाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक परवडणारा ठरणार आहे.

# 'वाघ चालला वाघाच्या कळपात!', ओमराजेंच्या घोषणेआधीच राणा जगजितसिंह पाटलांच्या मतदारसंघात झळकले स्वागताचे बॅनर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्याच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना ठाकरे गटाला मोठी गळती लागली आहे. ठाकरे गटाचे ६ खासदार पक्षाचा व्हीप धुडकावून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. या बंडखोर खासदारांच्या यादीत धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. या पार्श्वभूमीवर, ओमराजे निंबाळकर यांनी आपली अधिकृत राजकीय भूमिका स्पष्ट करण्यापूर्वीच धाराशिवच्या तुळजापुरात त्यांच्या स्वागताचे मोठे बॅनर झळकले आहेत. विशेष म्हणजे, ओमराजे निंबाळकर यांचे कट्टर राजकीय विरोधक भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या तुळजापूर मतदारसंघात हे बॅनर लावण्यात आले आहेत. शिंदे शिवसेनेचे तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव यांनी हे बॅनर लावले असून त्यावर 'वाघ चालला वाघाच्या कळपात!' असा थेट मजकूर लिहिण्यात आला आहे. यामुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. आदित्य ठाकरेंनी अधिक सक्रिय राहायला हवे होते: ओमराजे निंबाळकर दरम्यान, एका वृत्तपत्राला दिलेल्या जाहीर मुलाखतीत ओमराजे निंबाळकर यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली असून ठाकरे गटाच्या नेतृत्वावर, विशेषतः आदित्य ठाकरे यांच्यावर थेट निशाणा साधला आहे.

# चाकूने वार करुन एकाने दुसऱ्यास केले गंभिर जखमी

## मलकापूर येथील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – पोलीस स्टेशन हद्दीत १८ जुन रात्रीच्या दरम्यान २४ वर्षीय युवकाला चाकूने वार करुन २३ वर्षीय युवकांने जखमी केल्याची घटना मलकापूर नगरपरिषद जवळ घडली आहे.

जखमी दिलीप प्रेमलाल धुर्वे (२४) रा.उमरी ता.मुलताई, जि.बैतूल मध्यप्रदेश यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांची पत्नी पूजा दिलीप धुर्वे (२१) ही एक महिन्यापासून तिची आई जंवती मनोज उईके यांच्याकडे राहायला होती. १७ जुनला दुपारी २ वाजताच्या दरम्यान दिलीप धुर्वे हे मलकापूर येथे सासुकडे त्याच्या पत्नीला घ्यायला आला असता. त्यांच्या सासुने सांगितले की, त्यांची पत्नी पुजा ही गेल्या एक महिन्यापासून किरण बागडे यांच्या घरी राहत असुन ती आमच्यासोबत राहत नाही.

त्यानंतर दिलीप धुर्वे हा १८ जुनला रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान आरोपी किरण बागडे यांच्या घरी गेले व किरण बागडे याला म्हणाले की, माझ्या पत्नीला तुझ्यासोबत तुझ्या घरी का ठेवले? असे म्हटलं असता माझी पत्नी पूजा हे तिथेच होती व तिला माझ्यासोबत घरी चालें असे म्हटले असता ती तिथून दुसऱ्या रुम मध्ये गेली व मला तिथून शिवीगाळ करायला सुरुवात केली असता दिलीप धुर्वे यांनी त्यांची पत्नी पूजा हिला झापड मारली असता आरोपी किरण बागडे हा बाजूच्या रुममध्ये हातात चाकू घेऊन आला व माझ्या पोटाच्या उजव्या बाजूस व उजव्या पायाच्या मांडीवर चाकू मारुन जखमी केले असता जखमी दिलीप धुर्वे यांना चक्कर येऊन तेथेच पडले असता तिथून काही इसमानी त्यांना ग्रामीण रुग्णालय वरुड नेले असता डॉक्टरांनी तपासणी करुन पुढील उपचाराकरिता जिल्हा रुग्णालय अमरावती येथे पाठवले असून आरोपी विरुद्ध १०९ एक नुसार गुन्हा दाखल केला असून आरोपी किरण सुरेश बागडे (२३) रा.शेंदुरजनाघाट मलकापूर याला अटक केली असून ठाणेदार राहुल गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश शेगोकार, नितीन ठाकरे, राठोड, वीरेंद्र अमृतकर, सागर लेवलकर पुढील तपास करीत आहे.

# राज्यात उष्माघाताचे १० बळी, १९ संशयित मृत्यू

## आरोग्य विभागाच्या अहवालातील माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – जून महिन्यांचे २० दिवस उलटले तरी उन्हाचा तडाखा कायम आहे. राज्यात सूर्य आग ओकत असून पारा ४० अंश सेल्सिअसवर गेला आहे. मार्च महिन्यापासून तापमानात वाढ झाली असून राज्यात उष्माघाताचे १० बळी गेले आहेत, तर १९ संशयित मृत्यू असून उष्माघाताचा त्रास झालेल्या ३११ जणांची नोंद झाल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आले आहे. गेल्या काही वर्षांत जगभरातील तापमानात बदल जाणवू लागला आहे. उष्माघाताचे आजार वाढले आहे. उष्माघात हा एक प्रकारे गंभीर आजार आहे. शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढले, तर शरीराला सूर्याच्या गरमीपुढे सामान्य पातळी ठेवणे अशक्य होते. त्यामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याचे समोर येते. राज्यात वाढत्या तापमानामुळे उष्माघाताच्या रुग्णांमध्ये वाढ होत असून १ मार्च १९ जूनपर्यंत राज्यभरात उष्माघाताचे एकूण ३११ रुग्ण आढळले आहेत. यापैकी १० जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला असून १९ संशयित मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे.



# संपादकीय

**चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.**

## स्त्रीसुरक्षेसाठी समाजमन बदलणे गरजेचे

देशात महिलांवरील अत्याचारांच्या घटना वारंवार समोर येत आहेत. बलात्कार, छेडछाड, कौटुंबिक हिंसा, ऑनलाईन शोषण, पाठलाग अशा विविध प्रकारच्या गुन्ह्यांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. प्रत्येक घटनेनंतर कठोर शिक्षेची मागणी होते. दोषींना फाशी द्यावी, कडक कायदे करावेत, जलदगती न्यायालये स्थापन करावीत, अशा मागण्या समाजातून पुढे येतात. निश्चितच, कठोर कायदे आणि शिक्षा आवश्यक आहेत; मात्र केवळ शिक्षेच्या भीतीने स्त्रियांना संपूर्ण सुरक्षित वातावरण मिळू शकत नाही. कोणतीही स्त्री कुठल्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी आणि कसल्याही कपड्यांत मुक्तपणे, आत्मविश्वासाने व सुरक्षितपणे वावरू शकेल अशी परिस्थिती निर्माण करायची असेल, तर समाजाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय समाजात स्त्रीला एकीकडे देवीचे स्थान दिले जाते, तर दुसरीकडे तिच्या स्वातंत्र्यावर विविध बंधने लादली जातात. अनेकदा महिलांवरील अत्याचारानंतर तिच्याच वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. ती कुठे गेली होती, किती वाजता बाहेर होती, तिने कोणते कपडे घातले होते, तिच्यासोबत कोण होते, असे प्रश्न विचारले जातात. गुन्हेगाराला दोष देण्याऐवजी पीडित महिलेलाच जबाबदार धरण्याची प्रवृत्ती आजही समाजात मोठ्या प्रमाणात दिसून येते. ही मानसिकता बदलल्याशिवाय स्त्रीसुरक्षेचा प्रश्न सुटणे कठीण आहे. महिलांवरील अत्याचारांचे मूळ अनेकदा पुरुषप्रधान विचारसरणीत आढळते. स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे, तिचे अस्तित्व पुरुषाभोवतीच केंद्रित असावे, तिने ठराविक चौकटीतच राहावे, अशा संकल्पना अजूनही समाजाच्या एका मोठ्या घटकात रुजलेल्या आहेत. त्यामुळे स्त्रीच्या स्वातंत्र्याकडे संशयाने पाहिले जाते. महिलांनी शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राजकारण, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली तरी समाजातील काही घटक त्यांच्या स्वातंत्र्याला सहज स्वीकारू शकलेले नाहीत. परिणामी, महिलांना विविध स्वरूपातील भेदभाव आणि हिंसाचाराला सामोरे जावे लागते. कडक कायदे आणि शिक्षा यांचे महत्त्व नाकारता येणार नाही. निर्भया प्रकरणानंतर देशात अनेक कायदेशीर बदल करण्यात आले. महिलांवरील अत्याचारांसाठी शिक्षेच्या तरतुदी अधिक कठोर करण्यात आल्या. अनेक राज्यांमध्ये महिला सुरक्षा पथके, हेल्पलाईन आणि विशेष न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली. तरीही गुन्ह्यांच्या घटनांमध्ये अपेक्षित घट झालेली दिसून येत नाही. यावरून स्पष्ट होते की, कायद्याची भीती महत्त्वाची असली तरी ती एकमेव उपाय नाही. गुन्हे रोखण्यासाठी सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि परस्पर सन्मान यांचीही गरज असते. स्त्रीसन्मानाची जाणीव लहानपणापासूनच मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. घर हेच मुलांचे पहिले शिक्षणकेंद्र असते. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता समानतेचे संस्कार दिले गेले पाहिजेत. घरातील महिलांचा आदर, त्यांच्या मतांचा सन्मान, घरकामात सहभाग, निर्णयप्रक्रियेत समान स्थान अशा गोष्टींचा मुलांवर सकारात्मक परिणाम होतो. शाळा आणि महाविद्यालयांनीही लैंगिक समानता, संवेदनशीलता आणि मानवी मूल्यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. माध्यमांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, मालिका, जाहिराती आणि सोशल मीडियामधून अनेकदा महिलांचे चुकीचे किंवा वस्तू म्हणून चित्रण केले जाते. अशा गोष्टी समाजावर विपरीत परिणाम करतात.

# एल निनो : शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेलं अस्मानी संकट

कृषी व्यवसाय हा भारतातील सर्वश्रेष्ठ व महत्वपूर्ण व्यवसाय म्हणून ओळखला जातो. जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक कृषी क्षेत्र असलेला भारत देश हा शेती उत्पादनात जागतिक स्तरावर आघाडीवर असून जगात अन्न पुरवठ्याची देखील मध्यवर्ती भूमिका अधोरेखित करते. भारताच्या एकूण लोकसंख्याच्या ६४ टक्के लोकसंख्या ही शेती व शेतीवर आधारित व्यवसाय करतात.

भारतीयांसाठी शेतीचे महात्म्य केवळ उदरनिर्वाहापुरते मर्यादित नसून येथील संपूर्ण जीवनपद्धती शेतीशी निगडितआहे. भारतीयांच्या दृष्टीने शेती ही जीवन जगण्याची कला, जीवन जगण्याचे शास्त्र, आणि जीवन जगण्याचे आध्यात्म आहे. म्हणूनच काल, आज आणि उद्याही देशाला सर्व संकटातून तारुण नेण्याचे सामर्थ्य केवळ आणि केवळ शेतीमध्येच असून अश्याच कृषी व्यवसायाला समृद्ध करणारा शेतकरी राजा आज शेतीविषयक समस्यांनी त्रस्त असलेला दिसून येतो. निसर्गाचा लहरीपणा, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, सावकारांकडून घेतलेले कर्ज, सततची नापिकी, शेतमालाला योग्य भाव न मिळणे अशा अनेक कारणांमुळे शेतकरी आज मृत्यूला कवटाळतोय हे आजचे वास्तव आहे. हल्ली देशात दर मिनिटाला एक शेतकरी मृत्यूचा घोट घेत आपली जीवनयात्रा संपवितो ही भयावह परिस्थिती निर्माण झाली. देशाच्या पाठोपाठ महाराष्ट्रात देखील शेतकरी आत्महत्या हा विषय ज्वलंत व्हावा यापेक्षा दुर्दैव नाही. शासन प्रमुखांकडून शेतकरी आत्महत्येवर अद्यापही शाश्वत असे प्रतिबंध लावणे पाहिजे त्या प्रमाणात शक्य झाले नाही. शेतकऱ्यांप्रती सरकारची असलेली अविवेकी भावना या कारणांबरोबरच नैसर्गिक आपत्ती ही प्रमुख समस्या सुद्धा लक्षात घेणे तितकंच महत्त्वाचं ठरतं. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सध्या सुरु असलेले एल निनो चे दुर्भिक्ष्य. केवळ देशातच नव्हे तर संपूर्ण जगात हाहा:कार माजविणारा एल निनो हा देशाच्या काही भागात सक्रिय झाल्याचे चित्र आपण पाहतोय. महाराष्ट्रात सुद्धा याचे काही प्रमाणात पडसाद उमटायला सुरवात झाली आहे.





एल निनो ही प्रशांत महासागरातील एक नैसर्गिक आणि चक्रीय हवामान घटना आहे या काळात मध्य आणि पूर्व पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान सामान्यपेक्षा जास्त वाढते, ज्यामुळे जागतिक पातळीवर वाऱ्यांची दिशा बदलते आणि हवामानाचे चक्र बिघडते. आतापर्यंत प्रशांत महासागरातील सर्वात पाच तीव्र एल निनो पैकी यावर्षीचा एल निनो एक ठरला आहे. भारतीय हवामान संघटना यांच्या अहवालानुसार १२३ वर्षामध्ये २२ वेळ एल निनो ची परिस्थिती निर्माण झाली आणि या परिस्थितीमध्ये अनेक संकटांना सुद्धा सामोरे जावे लागले. यंदाचाही एल निनो हे शेतकऱ्यांसाठी अस्मानी संकट ठरतंय की काय? या विषयीची हतबलता सर्वच शेतकरी वर्गामध्ये दिसून येत आहे. पावसाचे असमान वाटप हे एल निनो चे प्रमुख लक्षण असून पेरणी योग्य पाऊस पडेल की नाही याबाबत शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. खरीप हंगामात घेतली जाणारी पिके प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्यामुळे पुढील दोन ते तीन महिने मान्सून कसा प्रभावित राहील याची मनोमन चिंता शेतकऱ्यांमध्ये दिसून येते. यंदा चांगला पाऊस पडून भरघोस पीक येईल, या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या मानगुटीवर अचानक एल निनो नावाचे भूत बसले. हल्लीच्या काळात शेतकऱ्यांसाठी शेती पिकवणे हे फार मोठे आव्हान निर्माण झाले असून दरवर्षी नवीन आशेच्या फांदीवर बसणारा शेतकरी केवळ निराशेच्या खाईत पडलेला दिसून येतो. एल निनो मुळे पाऊस अजिबात पडणारच नाही ; असे नसून त्या पावसाचे होणारे असमान वाटप ही चिंता वाढवणारी बाब आहे. या पार्श्वभूमीवरकृषी विभागाने शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना, पीक नियोजन, जलसंधारण आणि हवामानाधारित शेती व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

केवळ मार्गदर्शक सूचना देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील का? याचाही विचार होणे महत्त्वाचे वाटते. शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ एका हंगामपुरते मर्यादित नसून आयुष्याच्या येणाऱ्या प्रत्येक वळणावर तो निराशेच्या छायेखाली जीवन जगतो. आजही महाराष्ट्रात कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक असून ते पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात. अशा परिस्थितीत त्या शेतकऱ्यांनी काय करावे ? असा प्रश्न उपस्थित होतो. एल निनो सारख्या अस्मानी संकटातून मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःला धीर देणे खूप आवश्यक आहे. निसर्गाचा लहरीपणा आणि आयुष्याच्या वाटेवर आलेला नवीन संघर्ष समजून घेऊन शेतकऱ्यांनी पुढील प्रवासाठी सज्ज व्हावे कारण चिंता व चिंतन हे आत्महत्याकडे प्रवृत्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी स्वतःवर संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि आपले शेतीविषयक कार्य करावे.

शेती व शेतकरी हे परस्-परावलंबित घटक असून अख्ख्या जगाचा श्वास या दोन घटकांवर अवलंबून आहे असे म्हटल तरी वावगं ठरणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या असह्य वेदना लक्षात घेऊन त्यांच्याबद्दल शासन प्रमुखांनी संवेदना जिवंत ठेवाव्यात आणि शाश्वत असे धोरणात्मक निर्णय घ्यावेत अशी आशा आहे. भविष्यात एल निनो सारखे असंख्य संकट शेतकऱ्यांच्या जीवनात मुसंडी मारतील आणि त्यामुळे शेतकरी हतबल होऊन नाईलाजास्तव आत्महत्याकडे प्रवृत्त होईल ही परिस्थिती नियंत्रणात यावी यासाठी शेती विषयक शाश्वत विकासाची आवश्यकता आहे. यामुळे शेती व शेतकरी दोन्ही घटक समृद्ध होण्यास मदत होईल.



वैभव जिसकार
अमरावती

# मराठवाड्यातील शिवसेना आणि ठाकरे यांच्यावरील निष्ठेची परंपरा

मराठवाडा हा प्रदेश राजकीयदृष्ट्या नेहमीच महत्त्वाचा मानला गेला आहे. राज्याच्या सत्ताकारणात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या या भागाने अनेक मोठे नेते राज्याला दिले आहेत. एकेकाळी मराठवाडा हा शिवसेनेचा अभेद्य गड म्हणून ओळखला जात होता. विशेषतः शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावरील प्रचंड निष्ठा आणि भावनिक जिव्हाळा यामुळे या भागात शिवसेनेला मोठे जनसमर्थन लाभले. बाळासाहेबांच्या एका हाकेला हजारो शिवसैनिक रस्त्यावर उतरायचे, ही या भागातील राजकीय संस्कृतीची ओळख होती.



मराठवाड्यात शिवसेनेच्या वाढीचा इतिहास पाहिला, तर सुरुवातीच्या काळात मुंबई आणि ठाणे परिसरापुरता मर्यादित असलेला पक्ष हळूहळू ग्रामीण भागात विस्तारत गेला. मराठवाड्यातील दुष्काळ, बेरोजगारी, शेतीचे प्रश्न आणि विकासाचा अनुशेष या मुद्द्यांवर शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली. यामुळे सामान्य जनतेमध्ये पक्षाविषयी विश्वास निर्माण झाला. त्यातच बाळासाहेब ठाकरे यांची आक्रमक वक्तृत्वशैली, स्पष्टवक्तेपणा आणि जनसामान्यांशी असलेला भावनिक संवाद यामुळे मराठवाड्यातील जनतेने त्यांना मोठ्या प्रमाणावर स्वीकारले.

बाळासाहेब ठाकरे हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर अनेक शिवसैनिकांसाठी ते मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि कुटुंबप्रमुखासारखे होते. त्यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास इतका दृढ होता की, निवडणुकीत उमेदवार कोण आहे, यापेक्षा तो बाळासाहेबांचा उमेदवार आहे, हीच बाब मतदारांसाठी महत्त्वाची ठरत असे. अनेक ठिकाणी शिवसेनेचे उमेदवार केवळ ठाकरे यांच्या नावावर निवडून येत असल्याचे चित्र दिसून येत होते.

औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर), जालना, परभणी, हिंगोली, बीड, उस्मानाबाद, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये शिवसेनेने आपली मजबूत संघटनात्मक पकड निर्माण केली होती. ग्रामपंचायतींपासून ते लोकसभेपर्यंत शिवसेनेचे प्रतिनिधित्व वाढले. विशेषतः छत्रपती संभाजीनगर हे शहर शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखले जाऊ लागले. या यशामागे स्थानिक नेतृत्वाबरोबरच बाळासाहेबांविषयी असलेली जनतेची निष्ठा हा महत्त्वाचा घटक होता.

मात्र, काळाच्या ओघात राजकीय समीकरणे बदलत गेली. राज्यातील सत्तांतर, पक्षांतरे, बदलती सामाजिक आणि राजकीय परिस्थिती यामुळे मराठवाड्यातील शिवसेनेची ताकद काही प्रमाणात कमी झाली. शिवसेनेतील फूट आणि त्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय घडामोडींमुळे मराठवाड्यातील शिवसैनिक आणि मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. अनेक पारंपरिक नेत्यांनी वेगवेगळे राजकीय मार्ग स्वीकारले. त्यामुळे एकेकाळी अभेद्य मानला जाणारा गड काहीसा कमकुवत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तथापि, आजही मराठवाड्यात बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दलचा आदर आणि भावनिक नाते कायम आहे. राजकीय भूमिका बदलल्या असल्या, पक्षीय समीकरणे बदलली असली, तरी बाळासाहेबांच्या नेतृत्वाने घडवलेली पिढी आणि त्यांच्याविषयीची निष्ठा अजूनही अनेकांच्या मनात जिवंत आहे.

# जागतिक टेनिसमध्ये भारताची 'किरण'

भारतीय क्रीडाक्षेत्रात अनेक खेळाडूंनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. क्रिकेटप्रमाणेच टेनिसमध्येही भारतीय खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. या परंपरेत अलीकडच्या काळात उदयास आलेले एक महत्त्वाचे नाव म्हणजे किरण जॉर्ज. आपल्या जिद्दी, मेहनत आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर किरणने जागतिक टेनिसमध्ये भारताची नवी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच आज त्याच्याकडे भारतीय टेनिसमधील एक उदयोन्मुख तारा म्हणून पाहिले जात आहे.

कर्नाटकमधील बंगळुरू येथे जन्मलेल्या किरण जॉर्जने लहानपणापासूनच टेनिसकडे विशेष ओढ दाखवली. कठोर सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आपल्या खेळात सातत्याने सुधारणा केली. भारतीय टेनिसमध्ये स्पर्धा मोठ्या प्रमाणावर असताना स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणे हे सोपे नव्हते. मात्र, किरणने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या बळावर हे आव्हान यशस्वीपणे पेलले.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील उल्लेखनीय कामगिरीमुळे किरणचे नाव चर्चेत आले. विशेषतः आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याने अनेक बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून आपली क्षमता सिद्ध केली. त्याच्या खेळातील वेग, तांत्रिक कौशल्य आणि मानसिक ताकद ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. कोणत्याही परिस्थितीत शांत राहून खेळण्याची त्याची शैली त्याला इतर खेळाडूंपेक्षा वेगळे ठरवते.

भारतीय टेनिसला गेल्या काही वर्षांत नव्या चेहऱ्यांची गरज भासत होती. लिएंडर पेस, महेश भूपती, सानिया मिर्झा आणि सोमदेव देववर्मन यांसारख्या दिग्गज खेळाडूंनंतर पुढील पिढीवर मोठी जबाबदारी होती. अशा वेळी किरण जॉर्जसारख्या खेळाडूंचा उदय भारतीय टेनिससाठी आशादायी मानला जात आहे. त्याने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीने जागतिक क्रमवारीतही प्रगती साधली असून भविष्यात तो भारतासाठी मोठी कामगिरी करू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ नैसर्गिक कौशल्य पुरे-से नसते. त्यासाठी अत्याधुनिक प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ, आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा अनुभव आणि मानसिक तयारी आवश्यक असते. किरणने या सर्व बाबींमध्ये सातत्य राखत स्वतःला जागतिक स्तरावर सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या यशामागे त्याचे कुटुंब, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचेही मोठे योगदान आहे.

भारतात क्रिकेटला मोठ्या प्रमाणावर लोकप्रियता मिळत असली तरी टेनिससारख्या खेळांमध्येही देशातील युवक मोठ्या संख्येने पुढे येत आहेत. किरण जॉर्जसारख्या खेळाडूंच्या यशामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक युवा खेळाडू आता टेनिसकडे करिअर म्हणून पाहू लागले आहेत. यामुळे भारतीय टेनिसच्या विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे.

कूणच, किरण जॉर्ज हा केवळ एक खेळाडू नसून भारतीय टेनिसच्या नव्या आशेचे प्रतीक आहे. त्याच्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमामुळे तो जागतिक टेनिसमध्ये भारताची 'किरण' ठरत आहे. भविष्यातही त्याची अशीच प्रगती होत राहिली, तर जागतिक टेनिसमधील सर्वोच्च स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकविण्याचे स्वप्न तो निश्चितच पूर्ण करू शकेल.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सरकारी जमिनीवर मालकी नोंदवणाऱ्यांना दणका

## भाडेपट्टा नोंदीवर आता 'महाराष्ट्र शासन' कब्जेदार



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात मोठ्या संख्येने असलेल्या भाडेतत्त्वावरील शासकीय जमिनीवर स्वतःचीच मालकी सांगणाऱ्या संस्था, कंपन्या, प्राधिकरणे तसेच व्यक्तींना राज्य सरकारने मोठा दणका दिला आहे. आता अशा सर्व भाडेपट्ट्यावरील जमिनींच्या अधिकार अभिलेखात 'कब्जेदार' म्हणून केवळ 'महाराष्ट्र शासन' हीच नोंद करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

महसूल विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून, राज्यात पुढील तीन महिने विशेष मोहीम राबवताना अशा नोंदी तपासून त्या कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नावावर करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बावनकुळे यांनी दिले आहेत.

राज्य सरकारकडून अनेक व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी जमिनी भाडेकराराववर दिल्या जातात. मात्र, या जमिनींच्या कब्जेदार रकान्यात (सदरी) महाराष्ट्र शासनाच्या नावाऐवजी राज्य सरकारच्या परवानगीशिवाय भाडेपट्टाधारकांचीच नावे लागल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. तत्कालीन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रीतसर नोंदी न घेतल्याने, अनेक भाडेपट्टाधारक या सरकारी जमिनी स्वतःच्याच मालकीच्या असल्याचे गृहीत धरत आहेत.

# जिल्ह्यात खाद्यतेल अभियानांतर्गत 'मिनी ऑईल मिल'साठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यामध्ये सन २०२६-२७ या वर्षात सोयाबीन पिकासाठी 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजना' राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'मिनी ऑईल मिल (एक्सपेलर)' या घटकाचे लक्षांक प्राप्त झाले आहे.

पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीत-जास्त प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह आणि मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय अशा दोन घटकांचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गट यांना दिला जाणार आहे.

कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या नियमांनुसारच लाभार्थ्यांची निवड केली जाईल आणि यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जांमधून प्राधान्याने या योजनेसाठी लाभार्थी निवडले जाणार आहेत. या अभियानांतर्गत आर्थिक मर्यादेचा तपशील पाहता, मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह या घटकासाठी ४ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान देय राहील; तर मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय या घटकासाठी ३ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, यामध्येही युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल.

## बेनोडा परिसरात दोन शेतकऱ्यांच्या विहिरीवरील

# विद्युत मोटार व केबलची चोरी : २१ हजारांचा माल लंपास

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – नजीकच्या नागझिरी शेतशिवारात अज्ञात चोरट्याने दोन वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या विहिरीवरुन विद्युत मोटार पंप आणि केबल वायर चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बेनोडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, सतीश विष्णूपंत कुबडे (५२) रा.बेनोडा यांची मौजा नागझिरी येथे सर्व्हे नं.१७१ मध्ये ३ एकर शेती आहे. १६ जून रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास ते संत्रा झाडांना पाणी देण्यासाठी शेतात गेले असता, विहिरीवरील मोटार सुरु झाली नाही. त्यांनी विहिरीची पाहणी केली असता, विहिरीमध्ये असलेली ५ हॉर्स पॉवरची सीआरआय कंपनीची जुनी वापरती विद्युत मोटार किंमत अंदाजे ८ हजार रुपये आणि ७० फूट ३-कोअर केबल वायर किंमत अंदाजे ३ हजार रुपये असा एकूण ११ हजार रुपयांचा माल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

याच दरम्यान, कुबडे यांच्या शेतासमोरील मौजा नागझिरी गट नं.११७ मधील श्याम विठ्ठल हुरडे रा.बेनोडा यांच्या शेतातूनही अज्ञात इसमाने टर्बो कंपनीची जुनी वापरती विद्युत मोटार किंमत ८ हजार रुपये आणि केबल वायर किंमत २ हजार रुपये असा एकूण १० हजार रुपयांचा माल चोरुन नेला. दोन्ही शेतकऱ्यांच्या शेतातून एकूण २१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. या प्रकरणी सतीश कुबडे यांच्या तक्रारीवरून बेनोडा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहित कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

## अधिक मास उत्सवाच्या उत्तरार्धात

# साई मंदिरात महाप्रसाद वितरण कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील साई मंदिरात गेल्या काही वर्षांपासुन दर गुरुवारी ७ च्या आरती नंतर प्रसाद आणि महाप्रसाद याचे वितरण केले जात असतात त्याचाच एक भाग अधिक मास उत्सवाच्या उत्तरार्धात शेवटच्या दिवशी महाप्रसाद वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आलेल्या सर्वच साई भक्तांना शिरा व पुरीचे वितरण करण्यात आले होते. त्यावेळी संपूर्ण परिसरातून हजारो ज्यामध्ये भाविक, भक्त मुल, मुली, महिला, पुरुषांचा समावेश दिसुन आला होता.



कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता माजी सरपंच सुधाकर मानकर, भीमराव वाडोदे, सुरेश गुर्जर व मंदिराचे काही सहकारी यांचे मोलाचे योगदान लाभले. यापुढेही आणखी कोणाला महाप्रसाद कोणत्याही गुरुवारी करायची तयारी असल्यास त्यांनी येथे येऊन आपली तारीख नोंदवावी व पुण्य कामात हातभार लावावा, असे आवाहन पुजारी सुरेश गुर्जर यांनी केले.



**वरुड :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांना वाढदिवस निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा फोटो, ग्रामगीता, शाल व पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना जरुडच्या अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष राजु उमक तसेच पिंपळखुटा येथील माजी सरपंच राजेंद्र पडोळे.

# बारामतीत राजकीय हायड्रामा! दिवंगत अजित पवारांचा राज्यातला पहिला पूर्णाकृती पुतळा 'नटराज'मध्ये बसणार

## सुनेत्रा पवारांच्या मध्यस्थीनंतर पालिकेची एनओसी



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**बारामती** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांचा बारामतीमध्ये राज्यातला पहिला पूर्णाकृती पुतळा बसवला जाणार आहे. अजित पवारांच्या जयंती दिवशी हा पुतळा बारामतीच्या नटराज कला दालनात बसवला जाईल अशी माहिती नटराज नाट्य कला दालनाचे अध्यक्ष किरण गुजर यांनी सांगितलं. २२ जुलै रोजी दहा फुट उंचीचा ब्रॉंझ धातूचा अजित पवारांचा पुतळा बसवला जाईल. हा पुतळा बनवून तयार आहे. येत्या २२ तारखेला अजित पवारांच्या जयंती दिवशी हा पुतळा बसवला जाणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

या दिवशी विविध कार्यक्रमांचा आयोजन देखील करण्यात आला आहे. खरंतर या पुतळ्यावरून बारामतीत राजकारण पाहायला मिळाले. सर्व संबंधित विभागाच्या परवानगी मिळाल्या, मात्र बारामती नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी पुतळा बसवण्यासाठी ना हरकत परवानगी साठी टाळाटाळ केली अशी बारामतीच्या जनतेमध्ये चर्चा आहे. अखेर सुनेत्रा पवारांनी सांगितल्यानंतर हा पुतळा बसवण्याची परवानगी ना हरकत एनओसी नगरपालिकेकडून देण्यात आली अशी देखील चर्चा आहे.

बारामती नगरपालिकेच्या मुख्याधिकारी एनओसी देत नाही म्हणून किरण गुजर हे उपोषणाच्या तयारीत होते. मात्र उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनंतर ही ना हरकत परवानगी मिळाली अशी चर्चा आहे १० फुटी ब्रॉंझचा पुतळा सज्ज; विविध कार्यक्रमांची रेलचेल किरण गुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवारांचा हा पूर्णाकृती पुतळा तब्बल १० फूट उंचीचा असून तो उच्च दर्जाच्या ब्रॉंझ धातूपासून बनवण्यात आला आहे. हा पुतळा पूर्णपणे तयार असून केवळ त्याच्या अनावरणाची प्रतीक्षा आहे. २२ जुलै रोजी जयंतीच्या निमित्ताने बारामतीत भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी पुतळ्याच्या अनावरणासोबतच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल बारामतीकरांना पाहायला मिळणार आहे. पालिकेची टाळाटाळ आणि गुजर यांच्या उपोषणाचा इशारा अजित पवारांच्या या पहिल्या पुतळ्यावरून बारामतीत पडद्यामागे मोठे राजकारण रंगल्याची चर्चा आहे. पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व संबंधित शासकीय विभागांच्या परवानग्या किरण गुजर यांनी मिळवल्या होत्या.

## हुमनी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी

# आमनेरमध्ये प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील आमनेर येथे खरीप हंगामातील पार्श्वभूमीवर हुमनी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी आमनेर गावांमध्ये प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी गावांमध्ये शेतकऱ्यांना हुमनी अळीची ओळख, जीवनचक्र, पिकांवरील नुकसानीचे लक्षणे व नियंत्रणासाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाय योजनांसाठी आवश्यक माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.



हुमणी अळीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी वेळेवर खोल नांगरणी, प्रकाश सापळ्यांचा वापर, शेतातील स्वच्छता इत्यादी उपाय राबविण्याचे आव्हान करण्यात आले. तसेच बदलत्या हवामान परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना पीक नियोजन व एकात्मिक कीड व्यवस्थापना बाबत योग्य आणि सोप्या भाषेत शेतकऱ्यांना कृषी सहायक अधिकारी अर्चना उइके यांनी मार्गदर्शन केले.

या सभा मार्गदर्शन कार्यक्रमात गावातील माजी सरपंच गजानन पोकळे, माजी सदस्य राजू बालपांडे, अन्नार नवाब, जाहीर अली नवाब, सुधीर बोडखे, गौतम गेडाम, सुभाष पाटील, ओंकार बालपांडे, अफरोज नवाब, अर्जुन बोंद्रे, मुस्ताक दिवाण, जुबेर दिवाण इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

## बालमजुरी विरोधी जागतिक दिना निमित्य

# नुकसान भरपाई व मुलभुत कर्तव्ये विषयावर जनजागृती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुका विधी सेवा समिती, वरुड अंतर्गत बारवम जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय-१ वरुड येथे बालमजुरी विरोधी जागतिक दिना निमित्य पिडीत नुकसान भरपाई योजना व नागरिकांची मुलभुत कर्तव्ये या विषयावर जनजागृती करण्याकरीता जागृती योजना २०२५ अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष अतिरिक्त सत्र न्यायाधीश जिल्हा न्यायाधीश अ.अ.पंचभाई तर प्रमुख पाहुणे म्हणून दिवाणी न्यायाधीश म.दा.सैंदाणे, सह दिवाणी न्यायाधीश आय.जे ठाकरे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व्ही व्ही.राजुरकर, व तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.ए.आर.घाटोळे यांचेसह वकील मंडळी, न्यायालयीन कर्मचारी तसेच पक्षकार यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म.दा.सैंदाणे यांनी पिडीत नुकसान भरपाई योजनेबाबत उपस्थिताना मार्गदर्शन सविस्तर मार्गदर्शन केले तर प्रमुख अतिथी आय.जे.ठाकरे यांनी नागरीकांची मुलभूत कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अ.अ.पंचभाई यांनी पिडीत नुकसान भरपाई तसेच नागरीकांची मुलभूत कर्तव्ये याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन करतांना सन २००५-२००६ पासून पिडीतेला काही महत्वपूर्ण अधिकार देण्यात आले या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन तालुका वकील संघाचे सदस्य ॲड.जी.एम.मोरे यांनी तर आभार ॲड.डी.एम.पाटणकर यांनी मानले. या कार्यक्रमाला तालुका वकिल संघाचे सदस्य, न्यायालयीन कर्मचारी तसेच पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिनविशेष

**१९९७ : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने पुण्याजवळ राज्यातील मुलींसाठी पहिली सैनिकी शाळा सुरु केली.**

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४५९५० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १३३७००रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,३२,७३६ रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

# स्वाभिमान विकला की उरतात ती फक्त जिवंत प्रेतं

## शिंदेंच्या ऑपरेशन टायगरवर राज ठाकरेंचं मार्मिक भाष्य, फुटीर खासदारांना सुनावलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**मुंबई** – आज महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचा मेळावा पार पडत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे मेळाव्याला मार्गदर्शन करत आहेत. वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात हा मेळावा पार पडत आहे. या मेळाव्याला मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकचे पदाधिकारी उपस्थित आहेत, यावेळी बोलताना मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी म्हटलं की, 'महाराष्ट्रात, देशात अनेक ठिकाणी, खास करून महाराष्ट्रातच दुष्काळी परिस्थिती येणार आणि आमच्याकडे काय चाललंय? तर खासदार फोडणे, आमदार फोडणे, नगरसेवक फोडणे! आमची सत्ता कशी टिकेल, यासाठी वाटेल तेवढे पैसे द्यायला आम्ही तयार आहोत. माणसे विकली जात आहेत. मला वाटतं राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या गोष्टीचा विचार करायला नाही पाहिजे, जनतेने करायला पाहिजे, लोकांनी करायला पाहिजे. ज्यांना निवडून देण्यासाठी तुम्ही चार-चार, पाच-पाच तास, दोन-दोन, तीन-तीन तास उन्हामध्ये ज्या रांगेत उभे राहिलात, तो माणूस पन्नास-शंभर कोटींसाठी म्हणून विकला जातो. आता ज्या प्रकारचं राजकारण महाराष्ट्रात सुरू आहे, देशामध्ये सुरू आहे, भविष्यात येणाऱ्या पिढ्यांना आपण काय सांगणार आहोत? आम्ही विकले गेलो, म्हणून तुमच्यासमोर ही परिस्थिती आली? माझ्यासमोर आकडे आहेत, खास करून जो रिपोर्ट आज तुमच्यासाठी आणला आहे, देशात आत्महत्यांचे प्रमाण किती वाढले आहे, त्याचा हा रिपोर्ट आहे.

# बी.टी. सरांच्या निधनाने वैयक्तिक मार्गदर्शकाला मुकलो!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – माजी आमदार, शिक्षणतज्ञ आणि विविध सामाजिक प्रश्नांचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ नेते प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्र एका मोठ्या संघर्षशील नेतृत्त्वाला मुकला आहे.

माझ्या जीवनातील एक मार्गदर्शक मी गमावला आहे, अशी भावपूर्ण श्रद्धांजली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, ज्यासाठी संघर्ष केला, त्यासाठी जीवन समर्पित असेच आयुष्य ते जगले. मला तर त्यांच्याकडून व्यक्तिगतदृष्ट्या खूप काही शिकायला मिळाले. त्यांचे कायमच मोलाचे मार्गदर्शन मिळायचे. राजकारण आणि समाजकारण एकच आहे, असे मानणाऱ्या पिढीचे ते नेतृत्त्व करीत होते. अमरावती पदवीधर मतदारसंघाचे विधानपरिषदेत त्यांनी पाचवेळा प्रतिनिधीत्त्व केले. प्राध्यापक, शिक्षकांच्या हक्कांसाठी तर ते लढलेच, पण अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी विशेषत्त्वाने वाचा फोडली. एक अत्यंत अभ्यासू आणि प्रेरणादायी असे हे व्यक्तिमत्त्व होते. विधानपरिषदेतील त्यांची भाषणे ऐकत रहावी वाटायची. ती आजही नवीन सदस्यांसाठी प्रेरणादायी आहेत. विदर्भाच्या अनुशेषाविरोधात त्यांनी दिलेला लढा अत्यंत मोलाचा होता. मला आजही आठवते, सरकारी दरबारी भांडून न्याय मिळत नाही, म्हणून त्यांनी अनुशेष निर्मूलनासाठी थेट हायकोर्टात याचिका केली होती.

# विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – येत्या सोमवारपासून (२२ जून) सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी विधान भवन प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या वेळी विधान भवनात प्रवेश करण्यासाठी वापरले जाणारे पारंपारिक छापील पासेस पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. त्याऐवजी पीठासीन अधिकाऱ्यांपासून ते मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, अधिकारी, कर्मचारी, स्वीय सहायक आणि अभ्यागत अशा सर्वांनाच आता 'ई-प्रवेश प्रणाली' अंतर्गत 'चेहरा पडताळणी पद्धती' द्वारेच प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अत्यंत काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. अधिवेशन काळात विधान भवन परिसरामध्ये होणारी अवाढव्य गर्दी नियंत्रित करणे आणि सुरक्षा यंत्रणेवरील तपासणीचा ताण कमी करून सुलभता आणणे, हा या सुविधेमागील मुख्य हेतू आहे.या नव्या डिजिटल प्रणालीबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच विधिमंडळ वार्तांकनासाठी येणारे इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांचे सर्व पत्रकार प्रतिनिधींना सूचित करण्यात आले आहे.

# एका दिवसात सोनं ४,६०० तर चांदी १२,००० रुपयांनी स्वस्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – सोन्या-चांदीच्या दरात आज एकाच दिवसात मोठी घसरण झाल्याचे दिसून आले आहे.

सोन्याच्या दरात तब्बल ४,६०० रुपयांची घट झाली असून दर १,४४,९०० रुपयांपर्यंत खाली आले आहेत. तर चांदीच्या दरात १२,००० रुपयांची मोठी घसरण होऊन ती २,३७,००० रुपयांवर आली आहे. या अचानक झालेल्या घसरणीमुळे बाजारात चर्चेला उधाण आले आहे. जळगावातील सुवर्ण व्यावसायिक सुशील बाफना यांनी या घसरणीमागील कारणांवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या 'मते सोनं-चांदीच्या दरात घसरण होण्यामागे जागतिक आणि देशांतर्गत अशा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम आहे.

# बेकायदा भरतीसाठी उमेदवारांकडून १६.८५ लाखांची वसुली : निवृत्त संचालकावर गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**धुळे** – जिल्ह्यातून एक धकाकदायक प्रकार समोर आला आहे. धुळे जिल्ह्यातील कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) प्रकल्पातील भरती प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला असून, गट तंत्रज्ञान व्यवस्थापक (बीटीएम) आणि सहायक तंत्रज्ञान अधिकारी (एटीएम) पदांच्या नियुक्त्यांसाठी उमेदवारांकडून तब्बल १६ लाख ८५ हजार रुपयांची वसुली करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी तत्कालीन प्रकल्प संचालक तथा सेवानिवृत्त अधिकारी बबन नथ्थु पाटील यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यासह विविध फौजदारी कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) सखोल उघड चौकशीत भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शुक्रवारी (दि. १९) रात्री उशिरा मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे शासकीय भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# नागपूरच्या विद्यार्थ्याचे परीक्षा केंद्र थेट अबूधाबीत : पुनर्परीक्षेच्या आदल्या दिवशी एनटीएचा भोंगळ कारभार उघड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नागपूर** – नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षेच्या अवघ्या एक दिवस आधी, शनिवारी (दि.२०) नागपूरमधील एका विद्यार्थ्याला परीक्षा केंद्र थेट अबूधाबी (यूएई) येथे देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विद्यार्थ्याने परीक्षेसाठी नागपूरला पहिली पसंती दिली असतानाही हॉल तिकीटावर अबूधाबीतील केंद्र आल्याने त्याच्यासह कुटुंबीयांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मूळ छएएढ परीक्षेसाठी या विद्यार्थ्याला नागपूरमधील सरस्वती विद्यालय येथे परीक्षा केंद्र देण्यात आले होते.

मात्र, पेपरफुटी प्रकरणानंतर पुनर्परीक्षा जाहीर झाल्यावर त्याने नवीन हॉल तिकीट डाउनलोड केले असता त्यावर संयुक्त अरब अमीरातीतील अबूधाबी इंडियन स्कूल हे परीक्षा केंद्र असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांनी सांगितले की, अर्ज भरताना त्याने पहिली पसंती नागपूर, त्यानंतर वर्धा आणि भंडारा या शहरांची निवड केली होती. त्यामुळे प्रवेशपत्रावर परदेशातील केंद्र पाहून त्यांनाही धक्का बसला. विद्यार्थ्याचे वडील मोहम्मद तालीब यांनी सांगितले, 'आमच्या मुलाला परीक्षा देण्यासाठी परदेशात पाठवणे शक्य नाही. त्याच्याकडे पासपोर्टही नाही आणि आता प्रवासाची तयारी करण्यासाठी वेळही उरलेला नाही. एएनआयच्या वृत्तानुसार, कुटुंबीयांनी याप्रकरणी राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या हेल्पलाइनवर तक्रार दाखल केली आहे.

# प्राजक्ता माळीने उद्घाटन केलेल्या मॉलवर ४८ तासांतच एफडीएची धाड!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सिंधुदुर्ग** – अवघ्या दोन दिवसांपूर्वी अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या हस्ते दिमाखात उद्घाटन झालेल्या कुडाळ येथील 'आपला बाजार' मॉलवर शुक्रवारी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अचानक धाड टाकल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. उद्घाटनाची चर्चा सुरू असतानाच सरकारी यंत्रणेच्या या कारवाईमुळे मॉल आणि प्रशासनाच्या हालचालींबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा धडाका लावला आहे. त्याच पार्श्वभूमीवर कोकणातील विविध ठिकाणी तपासण्या सुरू असून कुडाळमधील ही कारवाई विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

ग्राहकांना बाहेर काढून चौकशीला सुरुवात : मिळालेल्या माहितीनुसार, एफडीएचे पथक शुक्रवारी अचानक 'आपला बाजार' मॉलमध्ये दाखल झाले. अधिकाऱ्यांनी सर्वप्रथम खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना बाहेर जाण्यास सांगितले आणि त्यानंतर मॉलचे मुख्य प्रवेशद्वार बंद करून तपासणी मोहीम सुरू केली.

पथकाकडून अन्नपदार्थांचे परवाने, साठा, उत्पादनांची गुणवत्ता, लेबलिंग तसेच इतर कायदेशीर कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८५/२०२६** **ने.ता.२७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती जया कैलास ठाकरे, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, २) कुणाल कैलास ठाकरे, वय अं.२३ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) गायत्री कैलास ठाकरे, वय अं.२० वर्ष, धंदा- शिक्षण, अर्जदार क्र.१ ते ३ रा.हातुर्णा, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरुड अर्जदार यांना **मयत कैलास मारोतराव ठाकरे, रा.हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८६/२०२६** **ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती मीना रमेश वसुले, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, २) अंकुश रमेश वसुले, वय अं.३२ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.जरुड, ता.मोर्शी, जि.अमरावती, ३) नीता विवेकराव दारोकर, वय अं.३७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.आष्टी, ता.आष्टी, ३) मयुरी अमोल संभे, वय अं.३५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.देऊरवाडा, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत रमेश दायाराम वसुले, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३०१/२४-२५** **दि.११/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **त्रिशला शेषराव दंडाळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे त्रिशला शेषराव दंडाळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.३१/१२/१९८९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **११/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**तहसिलदार**
**वरुड**




# पिक्चर अभी बाकी है! एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंना डिवचले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है. आगे आगे देखो होता है क्या अशा शब्दांत शिवसेनेचे पक्षनेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे सेनेला डिवचले आणि ठाकरे सेनेत आणखी फूट घडवून आणण्याचे संकेत दिले.

मी डॉक्टर नसूनही ऑपरेशन करतो. ऑपरेशन करण्यासाठी वाघाचं काळीज लागतं. लांडग्याचं नाही, असा टोलाही त्यांनी नुकत्याच झालेल्या ऑपरेशन टायगरचा संदर्भ देत लगावला. गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये शुक्रवारी शिवसेना शिंदे गटाकडून पक्षाचा ६० वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, बाळासाहेब नावात असून चालत नाहीत.

सुरळी बसस्थानक परिसरातील

# घरासमोरुन दुचाकी गेली चोरीला : गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – घराच्या समोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोराने चोरुन नेल्याची घटना तालुक्यातील सुरळी येथे घडली. याप्रकरणी वरुड पोलीसात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरळी येथील रहिवासी अशोक जनार्धन निकम (७३) यांनी त्यांच्या मालकीची हिरो होंडा फॅशन प्रो मोटरसायकल क्रमांक एमएच २७ सीजी ७७९४ किंमत अंदाजे ४० हजार रुपये घरासमोर उभी करुन ठेवली होती. गेल्या १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास अज्ञात चोराने ही दुचाकी चोरुन नेली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी कलम ३०३, २ भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल केला असून पो–लीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

वरुडमध्ये सायबर भामट्याची मोठी फसवणूक

# मृत व्यक्तीच्या बँक खात्यातून १४ लाख ८२ हजार लंपास

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरात एक धक्कादायक ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. एका सायबर भामट्याने फिर्यादीच्या मृत भावाच्या बँक खात्यावर डाका टाकत तब्बल १४ लाख ८२ हजार ४४२ रुपयांचा अपहार केला आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पा राजेंद्र आगरकर (५६) वर्षे, धंदा घरकाम, रा.भिष्णूर, ता.नरखेड, जि.नागपूर यांनी या संदर्भात वरुड पो–लीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन आरोपी उमेश रामराव ब्राम्हणे (४०) वर्षे, रा.भवानी चौक, वरुड याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी पुष्पा आगरकर यांच्या मृत भावाचे आयसीआयसीआय बँक वरुड शाखेत खाते होते. २७ सप्टेंबर ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत आरोपीने वेगवेगळ्या ऑनलाईन ट्रान्झॅक्शनद्वारे मृत व्यक्तीच्या खात्यातून तब्बल १४ लाख ८२ हजार ४४२ रुपये स्वतःच्या व पत्नीच्या मोबाईल आणि बँक खात्यावर ट्रान्सफर केले.

हा संपूर्ण प्रकार लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी १७ जून २०२६ रोजी वरुड पोलीस ठाण्यात रीतसर धाव घेऊन तक्रार नोंदविली. याप्रकरणी वरुड पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ३१६, ३१८ आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमच्या कलम ६६ सी, ६६ डी अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# टेरेसच्या कठड्याचा भाग कोसळून पादचाऱ्याचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – चुनाभट्टी परिसरातील 'गॅलेक्सी अपार्टमेंट' या १७ मजली इमारतीच्या टेरेसवरील कठड्याचे प्लास्टर शुक्रवारी रात्रीच्या सुमारास कोसळले. या दुर्घटनेत रस्त्यावरून जाणाऱ्या एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला. चुनाभट्टी, कुरेशी नगर येथे तळ अधिक १७ मजली 'गॅलेक्सी अपार्टमेंट' ही इमारत आहे. या इमारतीच्या टेरेसचा भाग शुक्रवारी मध्यरात्री रात्री १२.३९ वाजता कोसळला.

# राज्यभरात अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षाच!

## जमिनी सुख्या ठाक, खरीप हंगाम धोक्यात!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाताचे कोठार समजल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्याला यंदा पावसाने हुलकावणी दिलीय. जिल्ह्यात अद्याप पावसाने समाधानकारक हजेरी लावली नसल्याने खरीप हंगामावर यंदा मोठ संकट ओढवले आहे. जून महिन्याचा दुसरा आठवडा उलटला तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने पेरणी केलेली भातशेती उगवण्यावर प्रश्न चिन्ह निर्माण झालाय. तर दुसरीकडे कोंब आलेली पेरणीची शेती सुकून जात असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडलाय. त्यामुळे भाताचे कोठार समजल्या जाणाऱ्या या जिल्ह्यात यंदा भात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा बियाणे, शेतीवर केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे.

## कोकणातील शेतकऱ्यांना दुबार भात पेरणीची नामुष्की



कोकणात अद्याप समाधानकारक पाऊस नाही, शेतकऱ्यांना दुबार भात पेरणीची नामुष्की रायगड जिल्ह्यासह कोकणात यंदा जूनच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस न झाल्याने बहुतांश पेरणी केलेली भातशेती जमिनीत ओलावा नसल्याने सुकून जाण्याचे प्रकार समोर आलेत. त्यामुळे जमिन कोरडी पडल्याने पेरणी केलेली बियाणे उगवण्यावर परिणाम झालाय. त्यामुळे अनेक भागात शेतकऱ्यांना दुबार भात पेरणीची नामुष्की ओढवलीय. राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी देखील शेतकऱ्यांची व्यथा मांडत शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळवून देण्याची ग्वाही दिलीय.

कृषी विभागाकडून पेरणी थांबविण्यास सूचना, सरकारकडून मदतीची अपेक्षा रायगड हा कोकणासह राज्यात सर्वाधिक भातशेती करणारा जिल्हा ओळखला जातो. जिल्ह्यात यंदा ७३ हजार २६५ हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये सर्वाधिक पेरणी केलेला सुवर्णा, जया, त्यानंतर जोरदार, जोतिका, रुपाली, कर्जत कोळम, कोमल, याशिवाय नवनवीन भाताचे प्रयोग करण्यात आले आहेत.मात्र पावसाने यंदा दडी मारल्याने काही भागात कृषी विभागाकडून पेरणी थांबविण्यास सूचना करण्यात आल्या आहेत.त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्याला आता पावसाची आतुरता लागून राहिलीय.शिवाय पेरणी केलेल्या शेतकऱ्यांवर दुबार भात पेरणी करण्याची वेळ आलीय त्यामुळे होणारा खर्च आम्हाला परवडणार नसून सरकार कडून मदतीची अपेक्षा व्यक्त केलीय.

# 'ऑपरेशन कमळ'ची गरज : उद्धव ठाकरेंचा जोरदार हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – 'आजकाल चोरी पकडली की चोर त्याला 'ऑपरेशन' म्हणतात. भाजपच्या राजवटीत देशाची वाटचाल अराजकतेकडे सुरू असून ती लोकशाहीला धोकादायक आहे. जर सत्ताधारीच असे 'ऑपरेशन' करत असतील, तर आता देशाला वाचवण्यासाठी आपल्याला मिळून 'ऑपरेशन कमळ' (भाजपवर शस्त्रक्रिया) करावे लागेल', अशा जळजळीत शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त (हीरक महोत्सव) मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.

शिवसेनेच्या स्थापनेपासून मी संघटनेचा साक्षीदार असून मागील १२–१३ वर्षे पक्षनेतृत्वाची जबाबदारी सांभाळत आहे. ज्याक्षणी वाटेल, त्या दिवशी मी पद सोडल्याशिवाय राहणार नाही, अशी गर्जना करताच, संपूर्ण सभागृह उठून उभे राहिले आणि तुम्ही पद सोडू नका, असा आग्रह सर्वच शिवसैनिकांनी धरला.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी बंडखोर खासदार, काँग्रेसमध्ये विलीनीकरणाची अफवा, भाजपचे हिंदुत्व आणि ठाकरे कुटुंबावर होणाऱ्या वैयक्तिक आरोपांवरून अत्यंत आक्रमक आणि भावनिक भाषण केले. 'वन नेशन, वन इलेक्शन'वरून यांची वाटचाल 'वन पार्टी, नो इलेक्शन'कडे सुरू आहे. 'असा टोला लगावत, ज्या देशात तरुणाईला 'झुरळ' मानले जाते, त्या देशाचे भविष्य काय असणार? असा उपरोधिक सवालही त्यांनी केला. तीस वर्षे भाजपसोबत राहून आम्ही भाजपमध्ये विलीन झालो नाही, तर काँग्रेसमध्ये काय विलीन होणार? शिवसेना कधीही कुणात विलीन होत नसते. काँग्रेससोबत आपले टोकाचे वैर होते, पण त्यांनी कधी 'मातोश्री'वर डोळे वटारले नाहीत. भाजपने मात्र शिवसेनेला मुळासकट उपटून काढण्याचा प्रयत्न केला. भाजपचे निष्ठावान नेते आता दिल्लीच्या आदेशामुळे मिंधेंची दाढी खाजवत आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला.

